पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited 2022
'B++' Grade (CGPA 2.96)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**
केगांव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
✆ ०२१७-२७४४७७८/ ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५१३००
संकेतस्थळ : http:sus.ac.in ✉ bos@sus.ac.in

## अभ्यासमंडळे विभाग

# प रि प त्र क

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सलंग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, संकुलातील संचालक, शिक्षक व विद्यार्थी यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, दिनांक ०७/०४/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये N +२ च्या विद्यार्थ्यांसंदर्भात खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

**शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त संधी देणेबाबत N +२ गठीत समितीने दिनांक १२/०३/२०२६ रोजीचा दिलेला समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

सोबत N +२ गठीत समितीने दिनांक १२/०३/२०२६ रोजीचा दिलेला समितीच्या कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| विषय: १. | N+२ बाधित विद्यार्थ्यांना परीक्षेस संधी देणेबाबत. |
| ठराव: | N +२ UGC चे परिपत्रक १५ ऑक्टोबर २०१५ ला प्रसिध्द केले होते. तद्नंतर विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता N +२ बाधित विद्यार्थ्यांना परीक्षेस संधी देण्याबाबत N +२ कमिटी स्थापन करण्यात आली. तत्कालीन कोवीड परिस्थिती बघता ते २०१५ ते २०१८ पर्यंतच्या बाधित विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्यास संधी देण्यात आलेल्या आहेत.<br><br>कोव्हिड परिस्थितीच्या कालावधीमध्ये संधी देऊन सुद्धा काही विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म नजरचुकीने भरावयाचे राहून गेले आहेत. तसेच सदर संधी दिल्यानंतर ही विद्यार्थी परीक्षेची संधी देण्यासाठी वारंवार विद्यापीठास अर्ज करित आहेत.<br><br>दिनांक १६/०२/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये हा विषय पुन्हा चर्चेला आला होता.<br><br>त्यावेळी विद्यापरिषेच्या सदस्यांनी बाधित विद्यार्थ्यांना संधी देण्याबाबत विचार व्हावा. दिनांक १८/०२/२०२६ रोजीच्या अधिसभेमध्ये अधिसभा सदस्य श्री चनबसप्पा बंकुर ठराव क्र.१२ नुसार N +२ या तत्वास अनुसरुन बाधित विद्यार्थ्यांना आणखी एक संधी देण्यात यावी अशी शिफारस अधिसभेकडून विद्यापरिषेदेस केलेली आहे. तसेच दिनांक ०१/१२/२०२५ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीनुसार N +२ बाधित विद्यार्थ्यांबाबत अभिप्राय दयावा असे कळविलेले आहे,<br><br>वरील सर्व परिस्थिती पाहता N +२ समितीची बैठक दिनांक १२/०३/२०२६ रोजी आयोजित केली असता पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला. |

N +२ बाबत माजी प्र. कुलगुरु डॉ. गौतम कांबळे पुअहोसोविसो/४४३०, दिनांक १५ जुलै २०२३ ची नियमावली जशीच्या तशी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पुर्वी प्रवेशित असणा-या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त संधी देण्यात याव्यात. सदर एक वाढीव संधीमध्ये विद्यार्थ्यांनी सदरचा अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य राहील, सदर संधी प्रत्येक शैक्षणिक वर्षाला देण्यात येईल **तथापि N +२ बाधित विद्यार्थ्यांना एक वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षेव्दारे उपलब्ध करुन देण्यात आल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना संधी राहील. तद्नंतर कोणतीही संधी दिली जाणार नाही.**

सदर संधी हया त्या त्या सेमिस्टर मधील ६०-४० च्या अभ्याक्रमाप्रमाणे लागू असतील. बाधित विद्यार्थ्यांनी त्यांचे राहिलेले Theory paper, Practical, OJT, Field Project, या सर्व गोष्टी दिलेल्या संधी मध्येच पूर्ण करणे अनिवार्य आहे. **सदर N+२ बाधीत विद्यार्थ्यांना दोन संधी व्यतिरिक्त तिसरी संधी देण्यात येणार नाही.**

दिनांक १२/०३/२०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेला निर्णय हा NEP-२०२० अभ्यासक्रमातील बदल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून विद्यार्थी हितासाठी निर्णय घ्यावा असे वाटत आहे.

वरील निर्णय हा सर्व विद्याशाखेच्या पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) या विद्यार्थ्यांना लागू करावा असे वाटते.

**N+२ बाधीत विद्यार्थ्यांना NEP-२०२० प्रमाणे चालू असलेल्या शैक्षणिक अभ्यासक्रमानुसारच संधी देण्यात यावेत असे वाटते.**

वरील शिफारसी विद्यापरिषेदेकडे समितीने एकमताने सदर समिती करीत आहे.

वरील ठरावानुसार N+२ च्या संदर्भात परीक्षाविभागाकडून परीक्षा फॉर्म भरण्यासंदर्भात स्वंतत्रपणे कळविण्यात येईल. सदरची बाब या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना अवगत करण्यात येत आहे.

( डॉ. म.स.रोकडे)
उपकुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/अभ्यासमंडळे/२०२६/3833
दिनांक : 28 APR 2026

प्रति,

१ मा. प्राचार्य/संस्थाचालक, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालय
२ सर्व शैक्षणिक संकुल/विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ

सदर परिपत्रक आपल्या विभाग/संकुल व महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणावे.